# राज्यातील हवामान, खरीप हंगाम २०२०-२१ पिक पेरणी व पिक परिस्थितीचा दिनांक २२/०६/२०२० अखेरचा अहवाल

**हवामान व पर्जन्यमान** : राज्यात ११ ,जून २०२० रोजी मान्सूनचे आगमन झाले. १५ जून ,२०२० पर्यंत मान्सूनने संपूर्ण महाराष्ट्र व्यापला. मान्सून प्रगतीच्या काळात संपूर्ण महाराष्ट्रात चांगला पाऊस झाला. अहवाल कालावधीत बहुतांश विभागात आकाश ढगाळ होते. कोंकण व कोल्हापूर विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली. पुणे, औरंगाबाद व अमरावती विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या व तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली. नाशिक व नागपूर विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या व तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली. लातूर विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**पर्जन्यमान (२०२०)**

राज्यातील जून महिन्याचे सरासरी पर्जन्यमान २०७.६ मि.मी. असून, दि.२२ जून, २०२० अखेर राज्यात १७६.८० मि.मी. (८५.१० टक्के) पाऊस झाला आहे.

राज्यात दि.१ जून ते २२ जून २०२० अखेरीस सरासरीच्या तूलनेत प्रत्यक्ष पडलेल्या पावसानुसार जिल्ह्याची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पर्जन्यमान टक्केवारी | जिल्हे संख्या | जिल्ह्यांची नावे |
|---|---|---|---|
| १ | ० ते २५ % | ० | --- |
| २ | २५ ते ५० % | १ | पालघर |
| ३ | ५० ते ७५ % | १० | ठाणे, रायगड, नंदुरबार, सातारा, नांदेड, अकोला, वर्धा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली. |
| ४ | ७५ ते १०० % | १६ | रत्नागिरी,सिंधुदुर्ग, नाशिक, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, लातूर, उस्मानाबाद, हिंगोली, परभणी, बुलढाणा, वाशिम, अमरावती, यवतमाळ, भंडारा, नागपूर. |
| ५ | १०० % पेक्षा जास्त | ७ | धुळे, जळगांव, अहमदनगर, सांगली, औरंगाबाद, जालना, बीड. |

राज्यात २२ जून २०२० अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण ३५५ तालूक्यांपैकी ११ तालूक्यांत २५ ते ५० %, ४१ तालूक्यात ५० ते ७५ %, ७० तालूक्यात ७५ ते १००% तर २३३ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

**किड व रोग-**

दि.२२.०६.२०२० अखेरच्या नजर अंदाजित किडरोग अहवालानुसार राज्यात अमरावती, वर्धा, नागपूर, भंडारा व गोंदिया जिल्हयात दि.२४.०५.२०२० ते दि.१४.०६.२०२० पर्यंत टोळधाडीचा प्रादुर्भाव आढळून आला. टोळधाडीचा झुंड दि.१४.०६.२०२० रोजी गोंदिया जिल्हयातून मध्यप्रदेश राज्यात गेला. तसेच प्राथमिक अहवालानुसार राज्यात निसर्ग चक्रीवादळामुळे कोकण, नाशिक,पुणे व कोल्हापूर विभागातील ३३०३८ हे.क्षेत्र बाधित झाले असून, बाधित पिकांमध्ये शेतीपिके व फळ पिकांचा समावेश आहे.

## खरीप हंगाम २०२०-२१ पिक पेरणी -

राज्यात खरीप पिकांचे सरासरी क्षेत्र (ऊस वगळून) १४१.९९ लाख हेक्टर असून दि.२२ जून २०२० अखेर ५९.६० लाख हेक्टर क्षेत्रावर (४२.००%) पेरणी झाली आहे. तसेच राज्यात खरीप पिकांचे ऊस पिकासह सरासरी क्षेत्र १५१.३४ लाख हेक्टर असून ६०.५६ लाख हेक्टर क्षेत्रावर (४०.०२%) पेरणी/लागवड झाली आहे. राज्यात कोंकण विभागात खरीप हंगामासाठी जमीनीच्या पूर्व मशागतीची व रोपवाटिका तयार करण्याची कामे प्रगतीपथावर आहेत. रोपवाटिकेतील रोपांची वाढ समाधानकारक आहे. धुळवाफ पेर झालेल्या ठिकाणी भात उगवणीच्या अवस्थेत आहे. पिकांची उगवण समाधानकारक आहे. इतर विभागात खरीप हंगामासाठी जमीनीच्या पूर्व मशागतीची कामे झाली असून, सर्वच विभागात पिकांच्या पेरण्यांची कामे सुरु झाली आहेत. पेरणी झालेली पिके वाढीच्या अवस्थेत आहे.

### सन-२०२०-२१ चे खरीप हंगामातील पेरणी क्षेत्राचा सरासरी पेरणी क्षेत्राशी तुलनात्मक तक्ता




## विभागीय पिक परिस्थिती-

### कोकण विभाग-

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

### खरीप हंगाम-२०२०-२१

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.४२ लाख हेक्टर असून दि.२२ जून २०२० अखेर ०.२४ लाख हेक्टर क्षेत्रावर (५.४४%) पेरणी झाली आहे. विभागात खरीप हंगामासाठी जमीनीच्या पूर्व मशागतीची व रोपवाटिका तयार करण्याची कामे प्रगतीपथावर आहेत. रोपवाटिकेतील रोपांची वाढ समाधानकारक आहे. भात लागवड करण्यासाठी चिखलणीची कामे सुरु आहेत. भात व नाचणीच्या पुर्नलागवडीची कामे काही क्षेत्रावर झाली आहेत. तूर, मूग, उडीद व इतर तेलबिया पिकांच्या पेरणीची कामे सुरु झाली आहेत.

### नाशिक विभाग-

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २१.१९ लाख हेक्टर असून दि.२२ जून २०२० अखेर ९.५४ लाख हेक्टर क्षेत्रावर (४५.०४%) पेरणी झाली आहे. विभागात खरीप ज्वारी, बाजरी, मका, मूग, उडीद, भुईमूग, सोयाबिन इत्यादी पिकांच्या पेरणीची कामे सुरु झाली आहेत.

**पुणे विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ८.६७ लाख हेक्टर असून दि.२२ जून २०२० अखेर २.९६ लाख हेक्टर क्षेत्रावर (३४.१७%) पेरणी झाली आहे. विभागात खरीप हंगामाच्या पेरणी करीता पूर्व मशागतीची कामे सुरु आहेत. पिकांच्या पेरणीस सुरुवात झाली आहे. भात व नाचणी रोपवाटिकांमध्ये पेरणी सुरु आहे.

**कोल्हापूर विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ८.१४ लाख हेक्टर असून दि.२२ जून २०२० अखेर ३.२४ लाख हेक्टर क्षेत्रावर (३९.८०%) पेरणी झाली आहे. विभागात पेरणीयोग्य पाऊस झाल्याने पेरणींच्या कामांना वेग आला आहे. धुळवाफ पेर झालेल्या ठिकाणी भात वाढीच्या अवस्थेत आहे. रोप लागण क्षेत्रासाठी रोपवाटिका टाकण्याचे काम पुर्णत्वाकडे आहे. रागी पिकाच्या रोपवाटिका टाकण्याचे काम चालू आहे. इतर पिकांच्या पेरण्या गतीने सुरु आहेत. पेरण्या झालेल्या ठिकाणी पिके उगवण अवस्थेत आहेत. नवीन अडसाली ऊसाची लागवड चालू आहे. गळीतास जाणारा ऊस जोमदार वाढीच्या अवस्थेत आहे.

**औरंगाबाद विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २०.२३ लाख हेक्टर असून दि.२२ जून २०२० अखेर १०.११ लाख हेक्टर क्षेत्रावर (४९.९९%) पेरणी झाली आहे. विभागात सर्व जिल्हयांमध्ये चांगला पाऊस झाला आहे. कापूस, मका, बाजरी, तुर, मुग, उडीद, सोयाबीन इत्यादी पिकांच्या पेरणीस सुरुवात झाली आहे. पेरणी झालेल्या ठिकाणी पिके उगवण अवस्थेत आहेत.

**लातूर विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २७.९४ लाख हेक्टर असून दि.२२ जून २०२० अखेर ११.१८ लाख हेक्टर क्षेत्रावर (४०%) पेरणी झाली आहे. विभागात कापूस, मका, बाजरी, तुर, मुग, उडीद, सोयाबीन इत्यादी पिकांच्या पेरणीस सुरुवात झाली आहे. पेरणी झालेली पिके उगवण अवस्थेत आहेत.

**अमरावती विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ३२.१३ लाख हेक्टर असून दि.२२ जून २०२० अखेर १८.७५ लाख हेक्टर क्षेत्रावर (५८.३६%) पेरणी झाली आहे. विभागात कापूस, तुर, सोयाबीन इत्यादी पिकांच्या पेरणीस सुरुवात झाली आहे. पेरणी झालेली पिके उगवण अवस्थेत आहेत.

**नागपूर विभाग-**

**हवामान** - अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १९.२६ लाख हेक्टर असून दि.२२ जून २०२० अखेर ३.५७ लाख हेक्टर क्षेत्रावर (१८.५५%) पेरणी झाली आहे. विभागात सोयाबीन, तूर, कापूस पिकांची पेरणी सुरु झाली आहे. भात पिकाचे नर्सरी टाकण्याची कामे वेगाने सुरु आहेत. भात पऱ्हे टाकलेले आहे व आवत्यांची पेरणी झालेली आहे. जमीनीच्या मशागतीची कामे पुर्ण झाली आहे. तूर पिकाची शेतबांधावर लागवड करण्यात येत आहे.

| महाराष्ट्र राज्यातील खरीप हंगामातील मुख्य पिकाखालील दि. | | | | | २२.०६.२०२० | पर्यंत पेरणी अहवाल | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | क्षेत्र- हेक्टरमध्ये | |
| अ.क्र. | पिके | सरासरी क्षेत्र (सन २०१४-१५ ते २०१८-१९) | मागिल वर्षाची पेरणी (दि. १८/०६/२०१९) | प्रत्यक्ष पेरलेले क्षेत्र | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची सरासरी क्षेत्राशी टक्केवारी | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची मागिल वर्षाच्या क्षेत्राशी टक्केवारी | +/- प्रत्यक्ष पेरणी क्षेत्राची मागिल वर्षाशी तुलना |
| १ | भात | १५०३११९ | १९५९७ | १३६४७१ | ९ | ६९६ | ५९६ |
| २ | खरीप ज्वारी | ४८३२२८ | ० | १०१११ | २१ | #DIV/0! | #DIV/0! |
| ३ | बाजरी | ६७१५९४ | ० | २१२३०६ | ३२ | #DIV/0! | #DIV/0! |
| ४ | रागी | ९५५१० | ० | ६३४२ | ७ | #DIV/0! | #DIV/0! |
| ५ | मका | ८३८४७५ | १२ | ४२३१२८ | ५० | ३५२६०६७ | ३५२५९६७ |
| ६ | इतर तृणधान्य | ५२६६५ | ० | ३५२१ | ७ | #DIV/0! | #DIV/0! |
| **खरीप तृणधान्य** | | **३६४४५९१** | **१९६०९** | **८८२८७८** | **२४** | **४५०२** | **४४०२** |
| ७ | तूर | १२७४५७६ | ० | ४६३४३० | ३६ | #DIV/0! | #DIV/0! |
| ८ | मुग | ४८३६२५ | ० | १५८३६८ | ३३ | #DIV/0! | #DIV/0! |
| ९ | उडिद | ३५९१५३ | ० | ९७०४७ | २७ | #DIV/0! | #DIV/0! |
| १० | इतर कडधान्य | १००३४९ | ० | १२४४८ | १२ | #DIV/0! | #DIV/0! |
| **एकुण कडधान्य** | | **२२१७७०४** | **०** | **७३१२९३** | **३३** | **#DIV/0!** | **#DIV/0!** |
| **एकुण अन्नधान्य** | | **५८६२२९५** | **१९६०९** | **१६१४१७१** | **२८** | **८२३२** | **८१३२** |
| ११ | भुईमुग | २०२२९८ | ० | ८९११० | ४४ | #DIV/0! | #DIV/0! |
| १२ | तीळ | २३६८६ | ० | १४४५ | ६ | #DIV/0! | #DIV/0! |
| १३ | कारळ | १९८२७ | ० | १४४१ | ७ | #DIV/0! | #DIV/0! |
| १४ | सुर्यफुल | १७९८० | ० | ५९३ | ३ | #DIV/0! | #DIV/0! |
| १५ | सोयाबीन | ३८८०२४४ | १३७ | १८७५६४२ | ४८ | १३६९०८२ | १३६८९८२ |
| १६ | इतर गळीतधान्य | १३८४६ | ० | ६४६ | ५ | #DIV/0! | #DIV/0! |
| **एकुण तेलबिया** | | **४१५७८८२** | **१३७** | **१९६८८७६** | **४७** | **१४३७१३६** | **१४३७०३६** |
| **१७** | **कापूस** | **४१७८४११** | **१९४३०** | **२३७७२५७** | **५७** | **१२२३५** | **१२१३५** |
| **एकुण पेरणी क्षेत्र** | | **१४१९८५८८** | **३९१७६** | **५९६०३०४** | **४२.०** | **१५२१४** | **१५११४** |
| **१८** | **उस (लागवडीचा)** | **९३५१७९** | **०** | **९५९२३** | **१०** | **#DIV/0!** | **#DIV/0!** |
| **एकुण पेरणी क्षेत्र (ऊसासह)** | | **१५१३३७६७** | **३९१७६** | **६०५६२२७** | **४०.०** | **१५४५९** | **१५३५९** |
| टिप- पेरणी क्षेत्र नजर अंदाजीत | | | | | | | |